विजाभज आश्रमशाळा/ निवासीशाळा/ विद्यानिकेतन / उसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ०१ तारखेस करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागाव वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः विभशा २०१८/प्र.क्र.११९/विजाभज-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.
तारीख: १६ मे, २०१८

वाचा :- **शासन पत्र क्र. विभशा २०१२/१४९९/प्र.क्र.२२४/विजाभज-२, दि. १८ ऑक्टोंबर २०१२**

प्रस्तावना:-

विजाभज आश्रमशाळा/ निवासीशाळा/ विद्यानिकेतन / उसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ०१ तारखेस करण्याबाबत वाचा येथील शासन पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत. तथापि अद्यापही विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा ०१ तारखेस करण्यात अनेकदा दिरंगाई होत असल्याबाबत अनेक लोकप्रतिनिधी व कर्मचाऱ्यांच्या तक्रारी या विभागास प्राप्त झाल्या आहेत. यास्तव विजाभज आश्रमशाळा/ निवासीशाळा/ विद्यानिकेतन / उसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ०१ तारखेस करण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्याची बाब विचाराधी होती.

शासन परिपत्रक:-

विजाभज आश्रमशाळा/ निवासीशाळा/ विद्यानिकेतन / उसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ०१ तारखेस करण्यात यावे. याकरीता संबंधित आश्रमशाळेच्या आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांच्या आश्रमशाळेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या वेतनाची देयके संबंधित जिल्हा सहायक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत सादर करावे. जे मुख्याध्यापक त्यांच्या आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वेतनाची देयके प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत सादर करण्याबाबत दिरंगाई करतील त्यांच्यावर संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

अनुदान अप्राप्त असल्यास उणे प्राधिकारपत्र काढण्याची सोय शासनाने बीम्स (BEAMS) प्रणालीवर उपलब्ध केल्याने यापुढे कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत झाले नाही तर त्यासाठी संबंधित आश्रमशाळेच्या आहरण व संवितरण अधिकारी यांना जबाबदार धरून त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. ही बाब विचारात घेऊन राज्यातील विजाभज आश्रमशाळांतील सर्व आहरण व

संवितरण अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ०१ तारखेस होईल याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा ०१ तारखेस होण्याबाबत त्यांच्या स्तरावरील आवश्यक ती कार्यवाही विहित वेळेत करावी. याबाबत दिरंगाई झाल्यास त्यांच्याविरूद्ध योग्य ती प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक क्र. २०१८०५१७११३४४५२८२२ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

S. A. Pedgaonkar

Digitally signed by S. A. Pedgaonkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b2ac85a22a7c244beaad68d7bf50398b67204dc905155ddd4219e64a8ba0c058, cn=S. A. Pedgaonkar
Date: 2018.05.17 11:33:19 +05'30'

(सु.अ.पेडगांवकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालाचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
४. मा.राज्यमंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
५. सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे स्वीय सहाय्यक.
६. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, संचालनालय, पुणे
७. विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव.
८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
९. सहसंचालक (सुधारणा) लेखा व कोषागारे,मुंबई.
१०. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता,महाराष्ट्र (मुंबई/नागपूर)
११. महालेखापाल, लेखापरिक्षा, महाराष्ट्र (मुंबई/नागपूर)
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व.
१३. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व)
१४. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, (सर्व)
१५. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१६. मुख्याध्यापक, प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक आश्रमशाळा (सर्व)
१७. या विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळांचे संस्थाचालक (संबंधित क्षेत्रीय कार्यालयामार्फत)
१८. निवड नस्ती (विजाभज-२).